२-८७९

जा.क्र.कृआ/विप्र-७/जि.प.यो./महावितरण/वि.जो./ /२०२५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,दुसरा मजला,
साखर संकुल,शिवाजीनगर,पुणे - ४११ ००५.
ईमेल आयडी-scptsp०२४@gmail.com
दिनांक :-२७/०३/२०२५.

प्रति,
मा.व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण)

**विषय:- डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना प्रथम प्राधान्याने वीज जोडणी व सोलरपंप या घटकांचा लाभ देणेबाबत..**

संदर्भ :- १) कृषि व पदूम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०२३/प्र.क्र.८७/३अे, दि.०१.१०.२०२४
२) कृषि व पदूम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०२३/प्र.क्र.८८/३अे, दि.०१.१०.२०२४
३) कृषि आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना जा.क्र.विप्र-७/डॉ.बाआकृस्वायो/मासु/२०२४-२५/र-५२०/२०२४, दि.०३.१२.२०२४
४) कृषि आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना जा.क्र.विप्र-७/बिमुकृक्रायो/मासु/२०२४-२५/र-५२१/२०२४, दि.०३.१२.२०२४
५) कृषी सहसंचालक (विप्र-३),कृषि आयुक्तालय,पुणे तथा पालक संचालक (कोल्हापूर विभाग) यांचा दि.१७/०३/२०२५ ते दि.१८/०३/२०२५ रोजीचा कोल्हापूर विभागाचा दौरा अहवाल जा.क्र.स.संचालक/विप्र-३/१५/२०२५, दि.२१/०३/२०२५.

महोदय,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) अनुक्रमे अनुसुचित जाती व अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून राबविण्यात येत आहेत.

संदर्भ क्र.२ व ३ चे शासन निर्णयानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील)या योजनांच्या आर्थिक निकषांमध्ये सुधारणा व नवीन घटक समाविष्ट करण्याबाबत शासनाने मान्यता दिली आहे.त्यानुसार संदर्भ क्र.४ व ५ चे पत्रान्वये अनुक्रमे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील)या योजनांच्या अंमलबजावणीबाबत जिल्हा परिषदेच्या कृषी विभागास सविस्तर मार्गदर्शक सूचना शासन मान्यतेने निर्गमित करण्यात आल्या आहेत.(सुलभ संदर्भासाठी सदर शासन निर्णय व मार्गदर्शक सूचना सोबत जोडल्या आहेत.)

उपरोक्त संदर्भ क्र.२ व ३ चे शासन निर्णयानुसार संदर्भ क्र.३ व ४ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनेच्या शासन मान्यतेने निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार वीज जोडणी आकार व सोलरपंप या घटकांचा खालीलप्रमाणे लाभ देण्यात येतो.

१) **वीज जोडणी आकार-**

सदर योजनेंतर्गत वीज जोडणी आकार या घटकाच्या लाभाची मागणी करणाऱ्या लाभार्थ्याने विद्युत वितरण कंपनीकडे कोटेशन भरल्याची पावती आवश्यक आहे.अशा लाभार्थींना रुपये २०,०००/- किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते अनुदान सदर योजनेंतर्गत अनुज्ञेय आहे.

तसेच योजनांतर्गत वीज जोडणीची मागणी करणाऱ्या लाभार्थ्यांना प्राथम्याने वीजजोडणी देणेबाबत महावितरण कार्यालयाशी पाठपुरावा करावा.कृषि विकास अधिकारी यांनी जिल्हा नियोजन समिती तसेच जिल्हास्तरीय

समन्वय बैठकीत निवड लाभार्थींना विद्युत कनेक्शन मिळणेबाबत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे,असेही मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद आहे.

२) सोलरपंप-

जर शेतकऱ्यास महावितरण (किंवा शासनाच्या इतर यंत्रणेकडून) कंपनीकडुन सोलरपंप मंजूर झाला असेल,तर पंपसंच व वीजजोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु. ५०,०००/-) लाभार्थी हिस्सा रक्कम शेतकऱ्यास अनुज्ञेय आहे.

संदर्भ क्र.५ अन्वये असे निदर्शनास आले आहे कि,सदर योजनेंतर्गत महावितरण कंपनीकडून मंजूर करण्यात आलेल्या वीज जोडणी आकार व सोलरपंप या घटकांच्या लाभार्थी हिस्याची रक्कम अदा केली जाते.परंतु महावितरण कंपनीकडून नवीन वीज जोडणी आकार भरून घेण्यात येत नसल्याने सदर योजनांतर्गत वीज जोडणी आकार या घटकाचा लाभ देण्यास अडचणी येत आहेत.याशिवाय सोलरपंप मंजूर करत असताना अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील उपरोक्त योजनेमध्ये पूर्वसंमती मिळालेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य दिल्यास त्यांचा लाभार्थी हिस्सा देखील योजनेतून दिला जाऊ शकतो.

प्रस्तुत विषयी सादर करण्यात येते कि,डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनांतर्गत वीज जोडणी आकार व सोलरपंप लाभार्थी हिस्सा या घटकाची मागणी करणाऱ्या लाभार्थ्यांना महावितरण कंपनीकडून प्राथम्याने नवीन वीज जोडणी/सोलरपंप या घटकाचा लाभ दिल्यास अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या सदर शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ घेणे सुकर होऊ शकते.करिता संबंधितांना योग्य ते निर्देश होण्याची विनंती आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे

(र.शा.नाईकवाडी)
कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :-१) माहितीस्तव : अवर सचिव, ३ अे,कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

२) माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव
कृषि विकास अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)